# गुरूदेव हा जाणीला

( चाल : लाल दिव्याच्या गाडीला....)

गुरूदेव हा जाणीला, हरदेव हा मानीला
करू गुरू पुजा निशि दिन, गाउया गुरू वाणीला ||धृ ||

गुरू नाही नाशीवंत, गुरू आहे हा भगवंत
असे सांगतात ग्रंथ , असे बोलतात संत
चार वेद ही गाता ती, या अमर कहाणीला .....||१||

गुरू वचना मानुनी, त्या परीच वागावे
हिच खरी गुरू पुजा, स्व हिताला जागावे
गुरू चरणी त्यागावे, मोह माया राणीला .........||२||

मी तु पणा क्रोध दंभ, मनी नसो कुटील डाव
वैर द्वेष आणी निंदा, उच निच भेद भाव
मान पानाला सोडावे, या खेचा तानीला.............||३||

प्रेम घ्यावे प्रेम ध्यावे, प्रेमे जगाला जिंकावे
गुरू पुजेचे महत्त्व, सत्य हेचि तु जाणावे
'एकनाथा' चतुराई, सोड तु मन मानीला ...........||४||